**पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम.**
काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम, ता.जि.वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्रमांक - ०७२५२-२३२१३४.
ई -मेल:- sp.washim@mahapolice.gov.in.
संकेतस्थळ :- www.washimpolice.gov.in.

---

क्रमांक:- पोअवा/आस्था/सिक-हजर /पोलीस अंमलदार / 10057/२०२१, वाशिम दिनांक:- 0 3 DEC 2021

विषय:- पोलीस अंमलदार यांना सिकमधुन तसेच गैरहजेरीमधुन कर्तव्यावर हजर करुन घेणेबाबत.

**परिपत्रक:-**

--oo--

उपरोक्त विषयान्वये वाशिम जिल्हा पोलीस दलातील जे पोलीस अंमलदार सिक / गैरहजर असतात सदर पोलीस अंमलदार यांना कर्तव्यावर हजर करुन घेताना त्यांना कर्तव्यावर हजर होण्याकरीता या कार्यालयास पाठवितांना खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**१) <u>०१ ते ३० दिवसापर्यंत गैरहजर /सिकमध्ये असलेल्या पोलीस अंमलदाराबाबत:-</u>**

उपरोक्त प्रमाणे जे पोलीस अंमलदार हे ०१ ते ३० दिवसापर्यंत गैरहजर/ सिक मध्ये असलेल्या अंमलदाराना हजर करुन घेण्यासाठी संबंधित उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस उपअधीक्षक (मुख्या.) हे संबंधित पोलीस अंमलदार यांना कर्तव्यावर हजर करुन घेतील व ठाणेदार त्यांचा सदर कालावधीचा सिक अहवाल रजा मंजुरी करीता स्पष्ट अभिप्रायासह या कार्यालयास सादर करतील. तसेच पोलीस मूख्यालय वाशिम येथील सिक अहवाल पोलीस उपअधीक्षक (मुख्या.) वाशिम यांनी आपले स्पष्ट अभिप्रायासह संपुर्ण वैद्यकीय कागदपत्रासह या कार्यालयास सादर करावे.

**२) <u>३१ ते ९० दिवसापर्यत गैरहजर / सिकमध्ये असलेल्या पोलीस अंमलदाराबाबत:-</u>**

उपरोक्त प्रमाणे जे पोलीस अंमलदार हे ३१ ते ९० दिवसापर्यंत गैरहजर / सिक मध्ये असलेल्या अंमलदाराना हजर करुन घेण्यासाठी संबंधित पोलीस अंमलदार यांना अपर पोलीस अधीक्षक वाशिम यांचे आज्ञांकीत कक्षामध्ये सिक/ गैरहजेरीमधुन हजर होण्याकरीता पाठविण्यात यावे. त्यानंतर हजर होण्याचे आदेश प्राप्त झाल्यानंतर संबधित पोलीस अंमलदार यांचा सिक अहवाल या कार्यालयास रजा मंजुरी करीता ठाणेदार यांनी त्यांचे स्पष्ट अभिप्रायासह संपुर्ण वैद्यकीय कागदपत्रासह या कार्यालयास सादर करावा.

**३) <u>९१ दिवसापेक्षा जास्त गैरहजर / सिकमध्ये असलेल्या पोलीस अंमलदाराबाबत:-</u>**

उपरोक्त प्रमाणे जे पोलीस अंमलदार हे ९१ दिवसापेक्षा गैरहजर / सिक मध्ये असलेल्या अंमलदाराना हजर करुन घेण्यासाठी संबंधित पोलीस अंमलदार यांना पोलीस अधीक्षक वाशिम यांचे आज्ञांकीत कक्षामध्ये सिक/ गैरहजेरीमधुन हजर होण्याकरीता पाठविण्यात यावे. त्यानंतर हजर होण्याचे आदेश प्राप्त झाल्यानंतर संबधित पोलीस अंमलदार यांचा सिक

अहवाल या कार्यालयास रजा मंजुरी करीता ठाणेदार यांनी त्यांचे स्पष्ट अभिप्रायासह संपुर्ण वैद्यकीय कागदपत्रासह या कार्यालयास सादर करावा.

**४) पोलीस उपनिरीक्षक पासुनचे सर्व सिक /गैरहजर पोलीस अधिकारी.**

उपरोक्त प्रमाणे जे पोलीस अधिकारी हे सिक /गैरहजर असतील अशा पोलीस अधिकारी यांना पोलीस अधीक्षक वाशिम यांचे आज्ञांकीत कक्षामध्ये हजर करण्यात यावे.

उपरोक्त सर्व बाबींचा उद्देश हा १) अनाधिकृत गैरहजर/नियमबाह्य सिक प्रकरणांना आळा घालणे २) पोलीस दलाची शिस्तप्रियता राखणे ३) महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) मधील नियमाप्रमाणे तसेच NO WORK NO PAY किंवा रजा मंजुर झाल्यावर त्याप्रमाणे वेतन या तत्वाचे पालन करुन प्रशासनिक शिस्तप्रीयता आणणे व जे खरोखरच सिक मध्ये वा अनाधिकृत गैरहजर राहील अशांचे बाबतीत सहानुभुतीपुर्व विचार करुन त्यांची त्यांना देय रजा मंजुर करणे हा आहे. तरी उपरोक्त सर्व सुचनांचे सर्व ठाणेदार, राखीव पोलीस निरीक्षक, सर्व शाखा प्रमुख, उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस उपअधिक्षक (मुख्या.) यांनी अत्यंत काटेकोर पणे तंतोतंत पालन करावे.

हे परिपत्रक सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना समजणेकामी सतत सात दिवस / रात्र गणणेमध्ये वाचुन दाखवावे व तशा नोंदी स्टेशन डायरीला सात दिवस दोन्ही वेळेस घेण्यात याव्यात.

**( बच्चन सिंह भा.पो.से.)**
पोलीस अधीक्षक वाशिम

प्रति,

सर्व ठाणेदार /सर्व शाखा प्रभारी/ सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी वाशिम जिल्हा. संगणक कक्ष

प्रत माहितीस व उचित कार्यवाहीस्तव:-

अपर पोलीस अधीक्षक वाशिम/पोलीस उपअधीक्षक (मुख्या.) पो.अ.कार्यालय वाशिम.

प्रत माहितीस व उचित कार्यवाहीस्तव:-

प्रमुख लिपीक लेखाशाखा/पत्रव्यवहार शाखा/आस्थापना शाखा/वेतन लिपीक/कार्यालय अधिक्षक /विभागीय चौकशी लिपीक/आलि-२ व ३/डिपीजी लिपीक पो.अ.कार्यालय वाशिम.

२/- आस्थापना लिपीक-२ व ३ यांना कळविण्यात येते की, ०१ ते ९० दिवसांचे सिक कालावधीचे अहवालाची रजा मंजुरी करीता प्रकरण अपर पोलीस अधिक्षक यांचे कडे सादर करावी तसेच ९० दिवसावरील सिक रजेचे प्रकरणे आमचे कडे सादर करावी.

Sick